**प्रति,**

**1. मा. गृहमंत्री,**
महाराष्ट्र सरकार.

**2. मा. मुख्यमंत्री,**
महाराष्ट्र सरकार.

**विषय : महाराष्ट्रात तात्काळ 'धर्मांतर बंदी कायदा' लागू करण्याविषयी....**

महोदय,

राज्यात दिवसेंदिवस धर्मांतराची समस्या गंभीर रूप धारण करत आहे. आर्थिक आमिष, प्रलोभने, भावनिक जाळे आणि बळजबरी आदी अनेक माध्यमांतून गरीब आणि असाहाय्य हिंदूंचे धर्मांतर करण्यात येत आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी 'धर्मांतर हे राष्ट्रांतर' असल्याचे स्पष्टपणे म्हटले होते. त्याचा प्रत्यक्ष अनुभव आपण आज घेत आहोत. जानेवारी १९९० मध्ये काश्मिरमधून सुमारे साडेचार लाख हिंदूंना हुसकावून लावले; अद्यापपर्यंत काश्मीरमधील हिंदूंच्या हत्या थांबलेल्या नाहीत. परिणामी राज्यात अत्यल्प हिंदु शेष आहेत. काश्मीरमधील फुटीरतावादी पाकिस्तानची भाषा बोलत असतात. त्यांची निष्ठा पाकिस्तानशी आहे. याउलट ईशान्येकडील अनेक राज्यांत स्वातंत्र्याच्या वेळी येथे एक-दोन टक्के असलेले ख्रिस्ती बहुसंख्यांक झाले आहेत. काही राज्ये तर 'स्वतंत्र ख्रिस्ती राष्ट्रा'ची मागणी करत आहेत. धर्मांतरामुळे देशातील ९ राज्यांत हिंदू अल्पसंख्यांक झाल्याने तेथील अल्पसंख्यांक हिंदूंना संविधानानुसार जगणेही कठीण झाले आहे. एकूणच आमिष, प्रलोभने आणि बळजबरीने चालणारे हे धर्मांतराचे प्रकार संविधानाच्या विरोधात तर आहेच, तसेच मानवतेलाही काळीमा फासणारे आहेत. हे एक मोठे राष्ट्रविरोधी षड्यंत्र आहे.

**या अनुषंगाने काही सूत्रे आपल्या निदर्शनास आणून देत आहोत –**

१. २० ऑगस्ट यादिवशी संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील परंडी गावात बाबासाहेब शिंदे नावाच्या ख्रिस्ती पादरी 'आरोग्य सभे'च्या नावाखाली गोर-गरीब हिंदूंना फसवत आहे. कॅन्सर, बीपी, शुगरसह अनेक असाध्य रोग डोक्यावर हात ठेवला की बरे होतात, असे तो सांगत आहे. या माध्यमातून मोठ्या प्रमाणात धर्मांतराचे प्रकार देशभरात होत आहेत.

२. नुकतेच पालघर जिल्ह्यातील डहाणू येथील एका गरीब आदिवासी महिलेला पैसे देण्याचे आमिष दाखवत जबरदस्तीने धर्मांतर करणाऱ्या क्लेमेंट बैला, मरीयामा फिलीप्स, परमजीत उर्फ पिंकी शर्मा कौर आणि परशुराम धर्मा धिंगाडा या चार मिशनऱ्यांवर भा.दं.वि. कलम १५३, २९५, ४४८, ३४ प्रमाणे गुन्हे दाखल केला असून डहाणू पोलिसांनी त्यांना अटकही करण्यात आली आहे.

३. डहाणूच्या घटनेनंतर अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी, ब्राह्मणी येथील एका हिंदु महिलेचे जबरदस्तीने धर्मांतर करण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या संदर्भात भारतीय मानवाधिकार परिषदेने दोषींच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

४. यापूर्वीही पालघर जिल्ह्यातील आदिवासी भागांत आदिवासी हिंदूंचे धर्मांतर केल्याचे प्रकार घडले आहेत. यामुळे हिंदु बांधव आणि धर्मांतरित झालेले हिंदु यांच्यात सण-उत्सव साजरे करण्यावरून वारंवार वाद निर्माण होत आहेत.

५. 'लंगडा चालू लागेल', 'आंधळ्याला दिसू लागेल', 'बहिऱ्याला ऐकू येईल' आदी धादांत खोटा प्रचार करणाऱ्या 'चंगाई सभां'चा देशभरात सुळसुळाट चालू आहे. या सभांतून गोरगरीब हिंदूंना धर्मांतरित केले जाते.

६. ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर शहरात ख्रिस्ती मिशनऱ्यांनी तेथील दीड लाखाहून अधिक सिंधींचे धर्मांतर केले आहे. धर्मांतराचे हे प्रकार असेच चालू राहिले, तर येथील सिंधी समाज नामशेष होण्याची भीती आहे. या विरोधात हिंदु संघटना आणि सिंधी समाज यांनी एकत्र येऊन मोठा मोर्चा काढला होता.

७. डॉ. झाकीर नाईक याच्या ‘इस्लामिक रिसर्च फाऊंडशेन’ संघटनेच्या कल्याण येथून अटक केलेल्या रिझवान खान आणि अर्शिद कुरेशी या कार्यकर्त्यांनी सुमारे ७०० हिंदूंचे फसवून अन् प्रलोभनाद्वारे धर्मातर केले होते, असे आतंकवादविरोधी पथकाच्या तपासात आढळून आले आहे.

८. वांद्रे, मुंबई येथील हिंदू मॉडेल रश्मी शहाबाजकर हिच्यावर तिचा पती आसिफ शहाबाजकर याने धर्मांतर करण्यासाठी तिला बेदम मारहाण केली होती. तिने इस्लाममध्ये धर्मांतरास नकार दिल्याने तिला तलाक दिला.

९. अमरावती जिल्ह्यातील फ्रेजरपुरामध्ये एक दलित मुलीवर फईम अब्दुल नावाच्या युवकाने लैंगिक अत्याचार करून तिला इस्लाममध्ये धर्मांतर करण्यासाठी घरात डांबून ठेवले होते. या प्रकरणी अमरावती येथील फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात जानेवारी २०१८ मध्ये गुन्हा दाखल केला आहे.

येथे दिलेले उदाहरणे म्हणजे हिमनगाचे टोक आहे. या धर्मांतराची संख्या राज्यभरात मोठी आहे. या दृष्टीने **आम्ही पुढील मागण्या करत आहोत –**

**अ. तत्कालीन काँग्रेस शासनाने माजी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी समिती नेमली होती. अशा घटना रोखण्यासाठी धर्माधिकारी समितीने मध्यप्रदेश आणि ओडिसा राज्यांच्या धर्तीवर महाराष्ट्रातही धर्मांतरबंदी कायदा लागू करावा, अशी महत्त्वपूर्ण शिफारस दि. २९ नोव्हेंबर २०१४ यादिवशी एका अहवालाद्वारे शासनाला केली होती. हा अहवाल विधीमंडळात उघड करण्यात याावा, अशी आमची मागणी आहे.**

**आ. निवृत्त न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी अनेकदा पत्रव्यवहार करून समितीच्या शिफारशी लागू करण्याची मागणी तत्कालीन मुख्यमंत्र्यांकडे केलेली आहे. इतकेच नव्हे, तर हिंदु जनजागृती समिती, सामाजिक संघटना, लोकप्रतिनिधी यांनीही या विषयावर सतत पत्रव्यवहार आणि आंदोलन करून धर्मांतर बंदी कायदा करण्याची मागणी लावून धरली आहे.**

**इ. देशातील उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, छत्तीसगड, अरूणाचल प्रदेश, हिमाचल प्रदेश, गुजरात, उत्तराखंड, ओडिसा, झारखंड, कर्नाटक या १० राज्यांत धर्मांतर बंदी कायदा अस्तित्वात असून गोवा राज्यही हा कायदा करण्याच्या विचारात आहे. तरी महाराष्ट्रातही कठोर ‘धर्मांतर बंदी कायदा’ करावा, हा कायदा काळाची आवश्यकता आहे. यासाठी तात्काळ अध्यादेश काढण्यात यावा आणि कायदा संमत करण्यात यावा.**

हिंदु समाजाच्या धार्मिक भावना लक्षात घेता आपण आमच्या मागण्या अवश्य मान्य कराल, याची आम्हाला निश्चिती आहे. कळावे, ही विनंती !

आपला नम्र,